## महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग

# नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,नाशिक

## (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)

म्हाडा MHADA

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम-१९७६ च्या अंतर्गत (भू-विनियोग) नियम-१९८१ आणि (मालमत्ता व्यवस्थापन गाळयाची विक्री,हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम-१९८१ तसेच (भू-विनियोग) विनियम-१९८२ अन्वये व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणाच्या अधिन राहून **<u>गट क्र.३२३/१/२, आडगाव,जत्रा हॉटेलच्या मागे, पोलीस स्टेशन समोर, आडगाव-नांदुर फाटा रोड, नाशिक</u>** येथील खालीलप्रमाणे सदनिका **<u>एक रकमी खरेदी पध्दतीने</u>** वाटप करण्यास्तव पात्र अर्जदारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत. **योजनेचा तपशील खालील प्रमाणे:-**

**** दुसरी जाहिरात ****

| अ.क्र | तपशिल | १४ सदनिका (1BHK) पैकी ०६ सदनिका, मध्यम उत्पन्न गट (MIG) |
|---|---|---|
| ०१ | **योजनेचे ठीकाण** | गट क्र. ३२३/१/२, आडगाव,जत्रा हॉटेलच्या मागे, पोलीस स्टेशन समोर, आडगाव-नांदुर फाटा रोड, नाशिक |
| ०२ | **वाटपाची पध्दत** | सोडत पध्दतीने |
| ०३ | **सदनिकांची संख्या** | ०६ सदनिका |
| ०४ | **बांधकामाचे स्वरुप** | स्टील्ट + ४ मजल्याचे आर.सी.सी. फ्रेम्ड स्ट्रक्चर सिरॉमिक टाईल्स फ्लोरिंग, पावडर कोटेड ॲल्युमिनियम खिडकी, बाहेरुण सिमेंट पेंट, आतुन डिस्टेंपर, ग्रॅनाईट टॉप किचन ओटा, फ्लश दरवाजे, संडास-बाथरुमला पी. व्ही. सी. दरवाजे, अंर्तगत विद्युतीकरण, इमारतीस संरक्षण भिंत, पार्किंगमध्ये पेव्हर ब्लॉक इ. |
| ०५ | **सदनिकेचा तपशील** | बैठक खोली, शयनकक्ष (बाल्कनीसह), स्वयंपाकगृह (बाल्कनीसह) व संडास-बाथरुम. |
| ०६ | **एका सदनिकेचा बिल्टअप एरीया** | ६२.०३ चौ.मी. (६६७.४४ चौ. फूट) |
| ०७ | **एका सदनिकेचा कारपेट एरीया** | ४५.७६ चौ.मी. (४९२.३८ चौ. फूट) |
| ०८ | **एका सदनिकेची अंदाजित विक्री किंमत** | रु. १७,६४,८००/- |
| ०९ | **अर्जासोबत भरावी लागणारी रक्कम** | रु. १५०००/- |
| १० | **अर्ज पात्रतेनंतर भरावी लागणारी रक्कम** | रु. ४३७४५०/- |
| ११ | **भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत भरावी लागणारी रक्कम (अर्जासोबत भरलेली रक्कम वगळून)** | रु.१३,१२,३५०/- |
| १२ | **अर्जदाराचे सरासरी मासिक उत्पन्न मर्यादा** | रु. ५०,००१/- ते रु. ७५,०००/- पर्यंत. |
| १३ | **आरक्षणाचा तपशिल** | |

| अ.क्र | विगतवारी | उपलब्ध सदनिका |
|---|---|---|
| ०१ | सर्व साधारण जनता | ०६ |

**अर्ज विक्री कालावधी :**दि. २८/११/२०१६ ते दि. २९/१२/२०१६ **॥ अर्ज स्विकृतीचा कालावधी :**दि.२९/११/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ पर्यंत **(कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत) ॥**

**अर्ज विक्री किंमत :** रु. ३००/-

**अर्ज विक्री व स्विकृतीचे ठिकाण :**

मिळकत व्यवस्थापक यांचे कार्यालय, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन,राम गणेश गडकरी चौक, आयकर भवनासमोर,नाशिक-४२२००२.

**दुरध्वनी क्रं.** ०२५३-२२२९२१२/२२२९२१६ **॥ ई-मेल:** emmhadansk@gmail.com **॥ वेबसाईट :** www.mhada.maharashtra.gov.in **॥**

| | |
|---|---|
| **अधिक माहितीसाठी संपर्क** | श्री.के.आर.साळुंके, मिळकत व्यवस्थापक-९४२३१७४६६१<br>श्रीमती.एस.डी.जाधव, शाखा अभियंता-७७६८८०४४५५<br>श्री.आर.जे.सुर्यवंशी, कनिष्ठ लिपिक-९९२२३६०२५७ |

**<u>अटी व शर्ती :</u>**

१. योजनेतील सदनिका वाटपासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती अर्ज विक्रीच्या ठिकाणी उपलब्ध होतील, त्या अर्जदारास बंधनकारक राहतील.

२ .अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी (गेल्या २० वर्षापैकी किमान सलग १५ वर्ष महाराष्ट्रात रहिवास) असावा व त्याचे वय अर्ज करते वेळी १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

३. अर्जदाराचे जाहिरातीपासुन मागील १२ महिन्याची सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ग्राह्यधरण्यासाठी (अ.क्रं. १२ मध्ये दिलेल्या उत्पन्न प्रमाणे) अ) पती-पत्नी यांचे दोघांचे मिळुन नोकरीच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र यात किमान मुळ वेतन, ग्रेड-पे, महागाई भत्ता, व बोनस यांचा यांचा समावेश राहील. ब) व्यवसाय,उद्योग धंद्यापासुन उत्पन्न असल्यास आयकर विभागाचे प्रमाणपत्र किंवा तहसिलदारांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. क) शेतीपासुन उत्पन्न असल्यास स्वत:च्या नावाचा ७/१२ चा उतारा व शेतीपासुन मिळणा-या उत्पन्नाचा तहसिलदारांनी प्रमाणित केलेला दाखला.

४) सदनिकांची किमंत अंदाजित असून त्यात वाढ झाल्यास ती भरणे बंधनकारक राहील.

५) वाटप पत्रावर संबंधित मुद्रांक जिल्हाधिका-याकडे मुद्रांक शुल्काचा भरणा स्वतंत्ररित्या करणे आवश्यक राहील, त्यानंतरच सदनिकेचा ताबा प्राप्त होऊ शकेल.

६) अर्ज हे सुवाच्य अक्षरात अचूक व परिपूर्ण भरलेले असावेत तसेच त्यासोबत भरावयाच्या रकमेचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा किंवा शेडयुल्ड बँकेचा डी.डी अर्जासोबत जोडावा. डी.डी. हा ***<u>महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण</u>*** अथवा ***<u>म्हाडा नाशिक (MHADA NASHIK)</u>*** या नावाने घेवून तो <u>नाशिक शाखेवर</u> देय असावा.

७) अनामत रक्कमेवर व्याज देय नाही. ८) अर्जदाराचे स्वत:चे बँक खाते असणे बंधनकारक आहे. सदर खात्यामधूनच डिमांड-ड्राफ्टव्दारे अनामत रक्कमेचा भरणा करण्यात यावा. अर्जदाराचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेचे नाव, शाखा, बँक खाते क्रमांक इ. माहिती अर्जामध्ये नमूद करणे बंधनकारक आहे.

९) चटई क्षेत्र/बांधकाम क्षेत्रात किरकोळ बदल संभवतात. १०.) सदनिकांची संख्या व क्षेत्रफळ कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.

११. अर्जदार किंवा त्याची पत्नी/पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर,भाडेखरेदी पध्दतीवर अथवा नोदंणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणुन नाशिक महानगर पालिकाहद्दीत म्हाडाने वितरीत केलेला किंवा खाजगीरित्या संपादीत कलेला निवासी गाळा (सदनिका)/निवासी भुखंड नसावा.

१२. सदनिकाधारकांना सदनिका ताब्यात घेण्यापुर्वी ३० वर्षाचे आगाऊ लिज रेन्टचा भरणा करावा लागेल.

१३. सदर योजना म्हाडाने पुर्ण केलेली असुन भोगवटा प्रमाणपत्र (Completion Certificate) मिळण्यासाठी नाशिक महानगर पालिकेकडे अर्ज केलेला आहे. नाशिक महानगर पालिकेकडुन भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देता येईल, याची नोद घ्यावी.

**** सदनिकांच्या वितरणासाठी व अर्ज विक्री करण्यासाठी नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी,सल्लागार व प्रापर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही व्यक्तीशी परस्पर व्यवहार करु नये. तसे केल्यास कोणत्याही व्यवहारास/फसवणुकीस नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा जबाबदार राहणार नाही.**

**सही**
**रमेश का. मिसाळ**
**मुख्य अधिकारी,**
**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**नाशिक**

**महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग**

# नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,नाशिक

**(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)**

म्हाडा MHADA

**योजनेचे नांव:- गट क्र.३२३/१/२, आडगाव,जत्रा हॉटेलच्या मागे, पोलीस स्टेशन समोर, आडगाव-नांदुर फाटा रोड, नाशिक**

**(दुसरी जाहिरात)**

**अटी व शर्ती** **(अर्जदारास बंधनकारक)**

१. अर्ज सादर करावयाच्या दिनांकी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

२. विहित नमुन्यातील छपाई अर्जाची किंमत ३००/-आहे. अर्ज टपालाने अथवा कुरिअर सेवाद्वारे स्विकारले जाणार नाही.

३. अर्ज सादर करावयाच्या दिनांकाच्या मागील २० वर्षापैकी किमान सलग १५ वर्षे महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये वास्तव्य आवश्यक यासाठी

अ) तहसिलदाराचा दाखला (Domecile Certificate)

४. अर्जदाराची जाहिराती पासून मागील १२ महिन्याची सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा (जाहिरातीत अ.क्रं. १२ मध्ये नुमूद केल्या प्रमाणे)

अ) अर्जदाराचे स्वतःचे किंवा पत्नी-पती यांचे दोघांचे मिळून नोकरीच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र यात किमान मुळ पगार,ग्रेड पे,महागाई भत्ता व बोनस यांचा समावेश राहील.

ब) व्यवसाय,उद्योग धंदयापासून उत्पन्न असल्यास आयकर विभागाचे प्रमाणपत्र किंवा तहसिलदारांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.

क) शेतीपासून उत्पन्न असल्यास स्वतःच्या नावाचा ७/१२ चा उतारा व शेतीपासून मिळणा-या *उत्पन्नाचा तहसिलदारांनी प्रमाणित केलेला दाखला.*

५. अर्जदार किंवा त्याची पत्नी/पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर,भाडेखरेदी पध्दतीवर अथवा नोदंणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणुन नाशिक महानगर पालिकाहद्दीत म्हाडाने वितरीत केलेला किंवा खाजगीरित्या संपादीत कलेला निवासी गाळा (सदनिका)/निवासी भुखंड नसावा.

६. पात्र अर्जदारांना सदनिका ताब्यात घेतल्यानंतर ३ महिन्यात सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करावी लागेल. घरांसाठी लागणारा पाणी पुरवठा, नळजोड, सामाईक विद्युत जोड इ. साठी आवश्यक ते शुल्क/अनामत रक्कम भरुन अनुक्रमे स्थानिक महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य विद्दयुत कंपनी लिमिटेड कडून संस्थेस स्वखर्चाने दयावे लागेल. तसेच मालमत्ताकर,पाणी देयक पाण्याची व विजेची देयके इ. खर्च सदनिकाधारकांना सहकारी संस्थेच्या माध्यमातून संबंधितांकडे परस्पर भरावे लागेल. अंतर्गत ड्रेनेज /अंतर्गत पाणीपुरवठा यंत्रणा व इतर सामाईक सुविधांची देखभाल, दुरुस्ती सहकारी संस्थेस करावयाची आहे.

७. सदर किंमतीमध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही कराचा समावेश नाही. म.न.पा. यांनी मागणी केल्यानुसार सर्व प्रकारचे कर परस्पर सदनिकाधारकास भरावे लागतील.

८. महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी लिमिटेड यांच्या मागणीनुसार अनामत रक्कम भरुन प्रत्येक सदनिका धारकाने वैयक्तिक वीज जोड घ्यावयाचा आहे.

९. म.गृ.नि. व क्षे.वि. प्राधिकरण वरील योजनेत परिस्थितीनुसार बदल व सुधारणा करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

१०. अर्जदाराचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेचे नाव,शाखा,बँक खाते क्रमांक इत्यादी माहिती अर्जामध्ये नमुद करणे बंधनकारक आहे.

११. अर्ज हे सुवाच्य अक्षरात अचूक व परिपूर्ण भरलेले असावेत तसेच अर्जासोबत भरावयाच्या रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. अर्जासोबत जोडावा डी. डी. हा **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अथवा म्हाडा,नाशिक (MHADA NASHIK)**या नावाने घेवून तो **नाशिक** शाखेवर देय असावा.

१२. चटई क्षेत्र / बांधकाम क्षेत्रात किरकोळ बदल संभवतात.

१३. योजनेतील प्रति सदनिका किंमत अंदाजित असून बांधकाम व विकास कामे पुर्ण झाल्यावर प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे योजनेतील सदनिकाची अंतिम विक्री किंमत काढण्यात येईल.त्यानुसार विक्री किंमतीत वाढ झाल्यास वाढीव रकमेचा भरणा करणे सदनिकाधारकांवर बंधनकारक राहील.

१४. नाशिक मंडळाने सदनिका वितरणाचे देकार दिल्यानंतर (सोडत झाल्यानंतर) लाभार्थीने आपला अर्ज मागे घेतल्यास सदनिकेच्या किंमतीच्या १% रककम कपात करुण उर्वरीत रक्कम विना व्यात परत करण्यात येईल तथापी, अर्जदाराने आपला अर्ज देकार देण्याच्या अगोदर मागे घेतला तर अनामत रक्कमेतून रुपये १०००/- प्रशासकीय खर्च वजा करुन बाकी उर्वरीत रक्कम विना व्याजी परत करण्यांत येईल. अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज देय नाही.

१५. सदनिकेचा ताबा घेण्यापुर्वी मा.मुद्रांक नियंत्रक व नोंदणी महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २७/१०/२००४ रोजीच्या परिपत्रकानुसार सदनिकेच्या किंमतीवर विहीत दराने नियमानुसार मुद्रांक शुल्काचा भरणा करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

१६. पात्रते बाबतची कागदपत्रे मागणी केल्यावर विहीत कालावधीत सादर करावी लागतील.

१७. सदर सदनिकेची किंमत ही दि.३१/१२/२०१६ पर्यत परिगणीत केलेली असून, तद्नंतर नियमाप्रमाणे व्याजाचे भांडवलीकरण करुण येणारी अतिरिक्त रक्कम लाभार्थ्यांना भरावी लागेल.

१८. सदनिकांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

१९. सदनिकाधारकांना सदनिकेत कोणताही बदल करण्याची परवानगी नाही. अन्यथा अनधिकृत फेरफार व बांधकामाच्या विरोधात रितसर कार्यवाही करण्यात येईल.

२०. सदर योजना म्हाडाने पुर्ण केलेली असुन भोगवटा प्रमाणपत्र (Completion Certificate) मिळण्यासाठी नाशिक महानगर पालिकेकडे अर्ज केलेला आहे. नाशिक महानगर पालिकेकडुन भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देता येईल, याची नोद घ्यावी.

२१. सदनिकाधारकांना सदनिका ताब्यात धेण्यापुर्वी ३० वर्षाचे आगाऊ लिज रेन्टचा भरणा करावा लागेल.

सही
रमेश का. मिसाळ
मुख्य अधिकारी,
नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नाशिक